# ऋणनिर्देश

माझ्या लघु शोध प्रबंधाचा विषय **"सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९००-१९४७)"** हा आहे. यामध्ये २०व्या शतकाच्या सुरूवातीपासून ते स्वातंत्र्यापर्यंत सातारा शहराने शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक व धार्मिक क्षेत्रात कशाप्रकारे प्रगती घडवून आणली याचा आढावा घेण्यात आला आहे.

माझ्या लघु शोध प्रबंधास पूर्णत्व येण्यासाठी बऱ्याच व्यक्तिंनी मला प्रोत्साहन दिले आणि सहकार्य व मार्गदर्शन केले. त्यांचे ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे. माझ्या मार्गदर्शिका प्रा. डॉ. सौ. शोभना जाधव यांनी लघु शोध प्रबंधाच्या लिखाणासाठी मला सतत प्रोत्साहन दिले. तसेच अत्यंत आपुलकीने, निरपेक्ष वृत्तीने व परखडपणे मार्गदर्शन केले. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे मी हा लघु शोध प्रबंध पूर्ण करू शकले. मी त्यांची आभारी आहे. माझ्या लघु शोध प्रबंधासाठी माझे वडील श्री. सर्जेराव दिसले, आई सौ. मंदाकिनी दिसले व भाऊ चि. प्रविण दिसले, तसेच माझे सासरे श्री. मानसिंग रावसाहेब महाडिक व माझे पती श्री. प्रशांत मानसिंग महाडिक यांनीही मला वेळोवेळी मार्गदर्शन करून सहकार्य केले. त्यांचीही मी आभारी आहे.

लघु शोध प्रबंध लिहित असताना सातारा नगरपालिकेचे नगर वाचनालय, सातारा यांचेही सहकार्य लाभले. तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील ग्रंथालयातील ग्रंथपाल श्री. एस. व्ही. मोरे, असिस्टंट ग्रंथपाल श्री. पोरे सर व त्यांचे सहकारी यांचेही सहकार्य मिळाले. छत्रपती शिवाजी कॉलेजच्या इतिहास विभागातील त्याचप्रमाणे मराठी, भूगोल इ. विभागातील सर्व प्राध्यापकांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास लिहीत असताना शहरातील सामाजिक व सांस्कृतिक घटकांबद्दलची माहिती श्री. संभाजीराव पाटणे, श्री. गुलाबभाई बागवान, श्री. बबनराव उथळे, श्री. अरूण गोडबोले, श्री. आफळे बी. जी. इ. मान्यवरांच्या व अभ्यासकांच्या मुलाखतीतुन व सहकार्यातून मिळाली. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

या लघु शोध प्रबंधाचे कॉम्प्युटर टायपिंग अचूक व सुबक तसेच आकर्षक व नीटनेटकी बांधणी करून देणारे "समर्थ एंटरप्रायजेस", साताराचे श्री. सुनिल खळेकर व त्यांचे सहकारी यांची मी आभारी आहे.

हा लघु शोध प्रबंध संशोधक, अभ्यासू नागरिक व विद्यार्थी यांना उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करते.

N.S.Disale
कु. नलिनी दिसले.